पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 02/03/2020 (सोमवार)
(दुपार)

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 18 कि.मी अंतराव मौजा भिष्णुर शिवार येथे दिनांक 29/02/2020 चे 19.00 वा ते 19.30 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) दिनेश गुणवंतराव टुले, वय 44 वर्ष, 2) प्रमोद रामराव नासरे, वय 42 वर्ष, 3) सुभाष भाउराव भिसे, वय 48 वर्ष, व 4) मंगेश हिरामण भिसे, वय 48 वर्ष, व 5) मोरेश्वर ज्ञानेश्वर वानखडे व इतर दोन तीन लोक सर्व रा. भिष्णुर ता. नरखेड यांनी फिर्यादी नामे– किशोर खुशालराव नासरे, वय 26 वर्ष, रा. भिष्णुर, ता. नरखेड यांना थांबवुन ''तुझे ट्रॅक्टर नदीत घेवुन जा'' असे म्हटले. यावरून फिर्यादीने नकार दिल्याने आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी गोळा करून आरोपी क्र. 1 ने फिर्यादीचे गालावर 2 ते 3 थापडा मारले. फिर्यादीने मालकास बोलाविले असता आरोपीतांनी त्यांना सुध्दा शिवीगाळ करून रस्ता अडवुन, त्यांचे ट्रॅक्टर मध्ये असलेले टिकास, फावडे, घमेले व इतर पाने पेनचिस फेकुन नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 147, 149, 341, 323, 506, 193, 427 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. 2 ते 4 ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. राजेन्द्र सोनावणे 7798801816 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. वेलतुर – दिनांक 28/02/2020 चे 12.00 वा. ते दिनांक 29/02/2020 चे 23.00 वा. चे सुमारास पो. स्टे. वेलतुर हद्दीत फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– अक्षय काशीराम शास्त्रकार, वय 22 वर्ष, रा. गोठणगाव याने लग्नाचे आमिष दाखवुन फिर्यादींच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 363, 366 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री वैरागडे 9923795086 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावर मौजा खुमारी शिवार येथे दिनांक 01/03/2020 चे 09.00 वा. दरम्यान मनोजकुमार रमेश चौधरी, वय 29 वर्ष, रा. गेरूवा ता. जि. गढवा झारखंड ह. मु. जे.एस.ई. कंपनी खुमारी ता. कळमेश्वर हे खुमारी शिवारात असलेली जे.एस.ई. कंपनीचे गोडावूनचे वर टिन ठोकत असतांना जंगलातून अचानक मधमाशांचा झूंड आल्याने त्यांना चावत असल्याने ते अचानक खाली पडले. मनोजकुमार चौधरी यांच्या डोक्याला व इतर ठिकानी अंदरूनी मार लागला. त्यांना उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे नेले असता उपचारा पुर्वी त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मुकेश सिताराम चौधरी, वय 32 वर्ष, रा. कोरटा वार्ड क्र. 2 त. जि. गढवा झारखंड ह. मु. जे.एस.ई कंपनी खुमारी ता. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार विजय पांडे 7972431238 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर पहिलेपार केळवद येथे दिनांक 29/02/2020 चे 19:00 वा. दरम्यान नंदकिशोर परसराम बांगडे, वय 27 वर्ष, रा. पहिलेपार केळवद याने अज्ञात कारणातुन त्याच्या राहत्या घरी घराचे लाकडी फाटयाला नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राकेश परसराम बांगडे, वय 24 वर्ष, रा. पहिलेपार केळवद यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. केळवद येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई सचिन येलकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर